# प्रेसनोट दि. ०६/०५/२०१९

## आणेवाडी टोल नाका, सातारा येथे झालेल्या गोळीबारात पाहिजे असलेला कुख्यात गुंड रोहीदास चोरगेच्या साथिदारास युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----ooo----------ooo----------ooo----------ooo-----

दि. २५/०३/२०१९ रोजी ०१.०० वा.चे सुमारास टोलवरुन झालेल्या वादातुन सातारा पुणे महामार्गावरील आणेवाडी टोलनाक्यावर पुण्यातील कुख्यात गुंड रोहीदास ऊर्फ बापु चोरगे व त्याचे इतर साथिदारांनी गोळीबार करुन टोलनाक्यावरील कर्मचा-यांना मारहाण केली होती त्याबाबत भुईंज पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ४४/२०१९ भादवि कलम ३०७, १४३, १४७, १४८, १४९, आर्म ॲक्ट ३(२५) मु.पो.ॲक्ट क ३७(१)(३)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यापैकी काही आरोपी दाखल गुन्हयांत अटक करण्यात आले होते सदर गुन्ह्यात रोहीदास चोरगे याचेसह ६ ते ७ आरोपी अद्याप फरारी आहेत

युनिट -१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील अधिकारी व कर्मचारी पेट्रोलिंग करिता असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमीदारामार्फत मिळाली की सदर गुन्हयांत फरारी असलेला आरोपी नामे सुमीत धुमाळ हा भारती विदयापीठचे बॅक गेट जवळील चायनीजच्या दुकानावर आला असल्याची खात्रीशीर माहिती मिळावल्याने त्या बाबत मा. पोलीस निरीक्षक सो. श्री. अरुण वायकर यांना माहिती देवुन वरिष्ठांचे परवानगीने युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडील स्टाफसह बातमी प्रमाणे जावुन नमुद आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव सुमीत रमेश धुमाळ, वय ३२ वर्षे, रा. राजीव गांधीनगर, सुखसागर नगर, बिबवेवाडी, पुणे असे असल्याचे सांगीतले. त्याचेकडे भुईंज पोलीस स्टेशनकडील वरील दाखल गुन्हयाचे अनुशंगाने त्यांना विश्वासात घेवुन तपास करता त्याने सांगितले की, मी माझा मित्र रोहीदास चोरगे, सोपान चोरगे, लक्ष्मण लेकावळे, हरगुडे व इतर साथिदार असे मार्च महिन्यामध्ये मित्रांच्या गाड्यामधुन कोल्हापुर येथुन देवीदेर्शन घेऊन पुण्याला परत येत असताना आणेवाडी टोलनाका येथे टोल भरण्याच्या कारणेवरुन भांडणेझाली त्यावेळी आम्ही गोळीबार करुन आम्ही पळुन गेलो. सदर गुन्हा दाखल झाले पासुन मी फरार आहे असे सांगितले आहे भुईंज पोलीस स्टेशन, सातारा येथे गुन्हा दाखल असल्याने पुढील कारवाई कामी त्यास भुईंज पो स्टे सातारा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सहा. पोलीस आंयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस कर्मचारी अजय थोरात, अमोल पवार, वैभव स्वामी, अनिल घाडगे, बाबा चव्हाण, योगेश जगताप यांनी केली आहे.